# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☏/ फॅक्स २५६५६२३४, E-mail : ropune@dtemaharashtra.gov.n, Web : www.ropune.org.in

**कालमर्यादा : दिनांक २५/०४/२०१८.**

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/बदल्या/२०१८/ 1749 दिनांक 21 APR 2018

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी.
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर / मिरज.
प्राचार्य, म.रा. इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅने. अँड केट. टेक्नॉ., पुणे.

विषय : **प्रोग्रॅमर व ग्रंथपाल पदांवर कार्यरत कर्मचा-यांच्या बदल्यांबाबत माहिती सादर करणेबाबत.. समुपदेशनाद्वारे बदलीबाबतचे धोरण....**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दिनांक ०९ एप्रिल, २०१८.
(२) मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक १२/आस्था/बदल्या/२०१८/८९९, दिनांक १८/०३/२०१८.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भित शासन निर्णयान्वये समुपदेशनाद्वारे बदलीचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **https://www.maharashtra.gov.in/1145/शासन-निर्णय** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक २०१८०४०९१२५१४८६५०७ असा आहे. सदर शासन निर्णय आपल्या संस्थेतील प्रोग्रॅमर व ग्रंथपाल पदांवर कार्यरत कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून सदरचा शासन निर्णय त्यांच्या निदर्शनास आणल्याबद्दल त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

त्या अनुषंगाने शासकीय कर्मचा-यांच्या बदल्याचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ३ (१) नुसार सर्व सेवक यांचेकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी ३ वर्षाचा असेल, परंतु गट क मधील बिगर सेक्रेटरियट सेवेतील कर्मचारी असेल तर अशा कर्मचा-याने धारण केलेल्या पदावर दोन पदावधीची सेवा पूर्ण केल्यानंतर बदलीस पात्र आहे. सदर कालावधी प्रतिवर्षी ३१ मे रोजी पूर्ण केलेला ग्राह्य धरावा.

तेव्हा आपल्या संस्थेतील प्रोग्रॅमर व ग्रंथपाल पदांवर कार्यरत कर्मचा-यांच्या संदर्भित शासन निर्णयातील तरतूदींनुसार परिशिष्ट १ च्या सोबत जोडलेल्या विवरणपत्र १ मध्ये (विवरणपत्र २ मधील प्राधान्यक्रम विचारात घेऊन) भरुन घेऊन, सदरचे विवरणपत्र द्वि प्रतीत **दिनांक २५/०४/२०१८ पूर्वी** या कार्यालयास सादर करावीत. सोबत प्रोग्रॅमर व ग्रंथपाल पदांवर बदलीस पात्र कर्मचा-यांची यादी जोडली आहे.

सदर बदलीस पात्र प्रोग्रॅमर व ग्रंथपाल पदांवर कार्यरत कर्मचा-यांनी सादर केलेल्या विवरणपत्र १ नुसार त्यांची माहिती सदर शासन निर्णयातील टप्पा क्रमांक ५ मधील VI मध्ये भरुन या कार्यालयास **दिनांक २५/०४/२०१८ पूर्वी विवरणपत्रासह** सादर करावी. सदरची माहिती या कार्यालयाच्या **est.ropune@gmail.com** या ई मेल वर पाठवावी. **PDF मध्ये माहिती सादर करु नये.**

सदरची माहिती मुख्य कार्यालयास सादर करावयाची असल्याने अचुक माहिती **दिनांक २५/०४/२०१८ पूर्वी** या कार्यालयास सादर करावी

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : वरील प्रमाणे

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र संदर्भित शासन निर्णयासह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी व संबंधित संस्था प्रमुखांना त्यांच्या मेसेज बॉक्स मध्ये मेसेज पाठविणेसाठी रवाना.

## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

### सध्याच्या पदावर पदस्थापनेच्या ठिकाणी केलेल्या सेवेच्या कालावधीच्या ज्येष्ठतेनुसार दिनांक ३१/०५/२०१८ रोजी दोन पदावधी सेवा पुर्ण झालेल्या गट क मधील बदलीस पात्र कर्मचा-यांची यादी (प्रोग्रॅमर व ग्रंथपाल)

| अ. क्र. | प्रोग्रॅमर पदावर कार्यरत कर्मचा-याचे नांव व कार्यरत ठिकाण | प्रथम नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत संस्थेत किंवा कार्यालयात कधीपासून कार्यरत आहेत तो दिनांक व एकूण कालावधी | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (८) |
| | | **प्रोग्रॅमर** | | |
| ०१ | श्रीमती ए. एम. खळे शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महा. अवसरी | ०७/०७/१९९७ | ०१/०८/२०१० ७ वर्षे १० म. | ३१/१०/२०२७ |
| ०२ | श्रीमती साधना अविनाश ग्याले म. रा. एच. एम. सी. टी. पुणे | ०१/०९/१९९८ | ९/६/२०११ ६ वर्षे ११ महिने | ३१/५/२०२७ |
| ०३ | श्री. एस. पी. काळे, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | ०१/०९/१९९९ | ०९/०६/२०११ ०६ वर्षे ११ महिने | ३१/०५/२०३१ |
| ०४ | श्री. के. पी. इंगळे, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | १७/०७/१९९७ | १०/०६/२०११ ०६ वर्षे, ११ महिने | ३०/११/२०२२ |
| | | | | |
| | | **ग्रंथपाल** | | |
| ०५ | श्रीमती प्रतिभा राजेंद्रराव वानखेडे म. रा. एच. एम. सी. टी, पुणे | २७/५/२००३ | ४/६/२०११ ते आज अखेर ६ वर्षे ११ महिने | ३१/८/२०२४ |
| | | | | |

## परिशिष्ट १ सोबतचे विवरणपत्र १

## बदली पात्र कर्मचा-यांनी बदली प्राधिकारी कार्यालयास सादर करावयाची माहिती

(०१) कर्मचा-याचे संपूर्ण नांव :

(०२) पदनाम :

(०३) सध्याच्या कार्यरत असलेले कार्यालय व ठिकाण (अवघड क्षेत्रात की बिगर अवघड क्षेत्रात याबाबतच्या माहितीसह)

(०४) सध्याच्या पदावर रुजू झाल्याचा दिनांक :

(०५) कर्मचा-याचे वय :

(०६) आत्तापर्यंतच्या सेवेचा तपशील :

| अ. क्र. | पदनाम | शासकीय सेवेत कोणत्या ठिकाणी सेवा केली याबाबतचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यालयाचे नांव | कधी पासून | कधी पर्यंत | कालावधी (वर्षे / महिने) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

(०७) कर्मचारी बदली पासून सूट मिळण्यास पात्र असल्यास त्याबाबतची कारणे :

(०८) कर्मचारी विवरणपत्र २ मधील कोणत्या प्राधान्यक्रमांक अंतर्भूत होतो याबाबतची माहिती :

(०९) संबंधित प्राधान्यक्रमांक अंतर्भूत होत असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र / कागदपत्रांचे पुरावे :

(१०) बिगर अवघड बदली कोणत्या ठिकाणी करावी याबाबतचे कमाल १० पसंतीक्रम (१० पसंतीक्रमापैकी किमान २ पसंतीक्रम अवघड क्षेत्रातील नमूद करण्यात यावेत)

| अ. क्र. | पसंतीक्रम |
|---|---|
| ०१ | |
| ०३ | |
| ०५ | |
| ०७ | |
| ०९ | |

| अ. क्र. | पसंतीक्रम |
|---|---|
| ०२ | |
| ०४ | |
| ०६ | |
| ०८ | |
| १० | |

कर्मचा-याची स्वाक्षरी.

पदनाम व संस्था.----------------------------------------------------------

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त परिशिष्टामध्ये नमूद केलेली माहिती ही संबंधित कर्मचा-यांनी स्वतः लिहून दिलेली असून, ती त्यांच्या मूळ सेवा पुस्तकामधून तपासून घेण्यात आलेली आहे. याबाबत भविष्यात काहीही त्रुटी / तफावत आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचारी व सदर माहिती तपासणारे कर्मचारी / अधिकारी जबाबदार राहतील.

स्वाक्षरी (संस्था प्रमुख)

# परिशिष्ट १ सोबतचे विवरणपत्र -२

प्राध्यान्यक्रमांची यादी १ सोबतचे विवरणपत्र -२

| प्राध्यान्य क्रमांक | प्राध्यान्यक्रमाचे वर्णन |
|---|---|
| १ | जे शासकीय कर्मचारी स्वत: अपंग आहेत:- अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व या संबंधात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार जे कर्मचारी अपंग आहेत व यासंदर्भात ज्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक तथा सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ३० एप्रिल पूर्वी बदली प्राधिकाऱ्याकडे सादर केल्यास त्यांची प्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली करण्यात यावी |
| २ | जे शासकीय कर्मचारी, केंद्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने असक्षम ("disabled") या शब्दात अंतर्भूत (i) अंधत्व किंवा कमी दृष्टी (blindness or low vision), (ii) कमी ऐकू येणे (hearing impairment), (iii)हालचाल करता न येणे ( locomotor disability or cerebral Palsy ),(iv) कुष्ठरोगी (leprosy cured), (v) मानसिक दुर्बलता(mental retardation), (vi) मानसिक आजार (mental illness ), (vii)अनेक अपंगत्व( multiple disabilities), (viii) ऑटीझम (Autism), (ix) थॅलेसिमीया (Thalassemia), आणि (x) हिमोफिलिया (Hemophilia) हे आजार असलेल्या मुलांचे किंवा मतिमंद असलेल्या मुलांचे पालक ( पालक म्हणजे आई- वडील किंवा ते नसल्यास बहीण-भाऊ ) असून त्या मुलांचे मुख्य काळजीवाहक आहेत (serves as the main care giver )व शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदलीमुळे त्यांच्या असक्षम पाल्यांच्या पुनर्वसनामध्ये अडथळा निर्माण होत आहे, अशा शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांच्या आजारपणाचे किंवा मतिमंदत्वाबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक तथा सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ३० एप्रिल पूर्वी बदली प्राधिकाऱ्याकडे सादर केल्यास त्यांची प्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली करण्यात यावी. |
| ३ | जे शासकीय कर्मचारी स्वत: कर्करोगाने (कॅन्सर) आजारी / पक्षाघाताने आजारी / मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया किंवा डायलेसिस सुरू असलेले / ब्रेन ट्युमर किंवा मेंदुवरील शस्त्रक्रिया / निश्चेतनावस्था (कोमा) / मनोविकृतीने ग्रस्त /हृदयरोगाने आजारी आहेत, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना वरील आजाराबाबत औषधोपचार चालू असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३० एप्रिल पूर्वी बदली प्राधिकाऱ्याकडे सादर केल्यास त्यांचीप्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली करण्यात यावी. |
| ४ | ज्या महिला कर्मचारी विधवा/परितक्त्या आहेत |
| ५ | पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत ज्या शासकीय कर्मचारी यांचे पती किंवा पत्नी केंद्र किंवा राज्य शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषद किंवा पंचायत समिती अथवा शासकीय शैक्षणिक संस्थेमध्ये (शासकीय अनुदानित खाजगी शिक्षणसंस्था वगळून) कार्यरत आहेत, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या पती वा पत्नी यांचे ज्या जिल्ह्यात वा तालुक्यात वास्तव्य आहे, यथास्थिती त्या जिल्ह्यात वा तालुक्यात प्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार बदली करण्यात यावी. |
| ६ | शासकीय कर्मचारी यांची यथास्थिती पत्नी वा पती वा त्यांची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले आई किंवा वडील किंवा सासू किंवा सासरे हे कर्करोगाने (कॅन्सर) आजारी /पक्षाघाताने आजारी / मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया किंवा डायलेसिस सुरू असलेले / ब्रेन ट्युमर किंवा मेंदुवरील शस्त्रक्रिया / निश्चेतनावस्था (कोमा) / मनोविकृतीने ग्रस्त / हृदय शस्त्रक्रिया झाली असल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्याची प्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली करण्यात यावी. |
| ७ | उपरोक्त अनुक्रमांक १ ते ६ मध्ये अंतर्भूत न होणा-या उर्वरित बदलीपात्र अधिकारी/कर्मचारी यांची उपलब्ध रिक्त पदे व त्यांचा पसंतीक्रम विचारात घेऊन त्यांच्या ज्येष्ठतेनुसार बदलीसाठी शिफारस करण्यात यावी. |

[illegible]
शक्य होईल.

VI. <u>शिफारशी सादर करावयाचा नमूना</u> :- नागरी सेवा मंडळाने खालील विहित नमुन्यानुसार शिफारशी बदली प्राधिकारी यांचे मान्यतेस्तव सादर कराव्यात.

| प्राधान्य क्रमानुसार कार्यवाहीचे टप्पे | अ. क्र. | प्राधान्यक्रमातील कर्मचा-यांची ज्येष्ठतेनुसार यादी | संबधित कर्मचा-यांचा पसंतीक्रम (एकूण १० रकाने बनविणे) | पसंतीक्रमानुसार पद रिक्तते बाबतची + यापूर्वी काम केलेल्या ठिकाणांबाबतची विभागाने दिलेली माहिती | नागरी सेवा मंडळाची शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| अवघड क्षेत्रातील बदलीपात्र कर्मचारी | | | | | |
| कर्मचारी स्वत: अपंग आहे | | श्री. --- --- -- | | पसंतीक्रमामधील क्र. - येथील पद/पदे रिक्त आहेत. तसेच संबंधिताने ---, --- व --- या ठिकाणी यापूर्वी काम केले आहे. | विभागाची माहिती पाहता, पसंतीक्रम क्र.--येथील रिक्त पदी पदस्थापना देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. |
| | | श्री. -------- | | | |
| | | श्रीम. ------ | | | |
| असक्षम शब्दात अंतर्भूत पाल्याचे पालक असलेले कर्मचारी | | | | | |
| कर्मचारी स्वत: शासनाने नमूद केलेल्या आजाराने त्रस्त आहेत. | | | | | |
| महिला कर्मचारी विधवा / परितक्त्या आहेत. | | | | | |
| पती-पत्नी एकत्रिकरण | | | | | |
| कर्मचाऱ्यावर अवलंबून कुटुंबिय शासनाने नमूद केलेल्या आजाराने त्रस्त आहेत. | | | | | |
| उपरोक्त प्राध्यान्य क्रमांक १ ते ६ मध्ये अंतर्भूत न होणारे कर्मचारी | | | | १० पसंतीक्रमापैकी एकही पद रिक्त नाही. तसेच संबंधिताने ---, --- व --- या ठिकाणी यापूर्वी काम केले आहे. | विभागाची माहिती पाहता, प्रशासनाच्या कामाच्या निकडीनुसार-- या रिक्त पदी पदस्थापना देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. |
| बिगर अवघड क्षेत्रातील बदलीपात्र कर्मचारी | | | | | |
| वरीलप्रमाणे सर्व कार्यपध्दतीचा अवलंब करून बिगर अवघड क्षेत्रातील बदली पात्र कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात शिफारशी करण्यात याव्यात. | | | | | |